Reg. No. NP CITY/236/2018-20.

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## प्राधिकृत प्रकाशन

वर्ष ८, अंक ३३ ] गुरूवार ते बुधवार, ऑक्टोबर २०-२६, २०२२/आश्विन २८- कार्तिक ४, शके १९४४ [पृष्ठे ३, किंमत रुपये ८.००

स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी प्रत्येक विभागाच्या पुरवणीला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.

## भाग एक-अ—अमरावती विभागीय पुरवणी

**(भाग चार-ब मध्ये प्रसिद्ध करण्यात आलेले आहेत त्यांव्यतिरिक्त) केवळ अमरावती विभागाशी संबंधित असलेले महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या, ग्रामपंचायती, नगरपालिका बरो, जिल्हा नगरपालिका, प्राथमिक शिक्षण व स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम या अन्वये काढण्यात आलेले आदेश व अधिसूचना.**

भाग १-अ (अ.वि.पु.) म. शा. रा., अ. क्र. १५०.

**जिल्हाधिकारी, यांजकडून**

**शुद्धीपत्र**

क्रमांक नविशा-कक्ष-२-२४४६-२०२२.—

या कार्यालयातील पत्र क्रमांक कक्ष-२-नविशा-१७१७-२०२२, दिनांक ४ ऑगस्ट २०२२ नुसार नगर परिषद सार्वत्रिक निवडणूक २०२२ च्या मेहकर नगरपरिषदेची सदस्य पदाच्या आरक्षणाची अंतिम अधिसूचना महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग-१ अ अमरावती विभागीय पुरवणी, दिनांक ५ ऑगस्ट २०२२ रोजी अनुक्रमांक ४७९, पान नंबर ६ वर प्रसिद्ध करण्यात आली होती. त्यात काही त्रुट्या आढळून आल्यामुळे खालीलप्रमाणे दुरुस्ती करण्यात येत आहे.—

| | | | याऐवजी | असे वाचावे |
|---|---|---|---|---|
| अनुक्रमांक | राजपत्र पान क्रमांक | राजपत्र रकाना क्रमांक | राजपत्रात छापण्यात आलेला मजकूर | दुरुस्ती करणे आवश्यक असलेला मजकूर |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
| १ | ६ | ५ | ११ अ—नागरिकांचा मागास प्रवर्ग | ११ अ—नागरिकांचा मागास प्रवर्ग (महिला) |
| २ | ६ | ५ | ११ ब—सर्वसाधारण महिला | ११ ब—सर्वसाधारण |

**एस. रामामुर्ती** (भा.प्र.से),
जिल्हाधिकारी,
बुलडाणा.

बुलडाणा :
दिनांक ११ ऑक्टोबर २०२२.

अ.-एक-अ-१ (१७१४).

भाग १-अ (अ.वि.पु.) म. शा. रा., अ. क्र. १५१.

**प्रशासक, नगर परिषद, यांजकडून**

**मोर्शी नगर परिषदेच्या मंजूर विकास योजनेतील महाराष्ट्र व नगर रचना अधिनियम,**

**१९६६ चे कलम ३७ अन्वये फेरबदल करण्याबाबत–**

क्रमांक नपामो-जा. क्र.-नर-१०३९-२०२२.—

महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ चे तरतुदीप्रमाणे मोर्शी शहराची विकास योजना तयार करण्यात आली असून शासनाचे नगर विकास विभागाची अधिसूचना टिपीएस-२८०३-१६९८-सीआर-३७७. सीबी/२००३ युडी-३०, दिनांक ११ जुलै २००५ अन्वये अंतीमरित्या मंजूर झाली असून ती दिनांक ०१ सप्टेंबर २००५ पासुन अंमलात आली आहे. तसेच पुनर्प्रसिद्ध विकास योजना शासनाचे नगर विकास विभागाची अधिसुचना टिपीएस-२८०६-२९८-प्र.क्र.१८६-२००६-नवि-३० दिनांक २८ मार्च २००८ नुसार मंजूर झाली असून दिनांक १५ मे, २००८ नुसार अंमलात आली आहे.

मोर्शी शहराचे विकासाचे दृष्टीने वरिल मंजूर विकास योजनेमध्ये खालील फेरबदल करणे आवश्यक आहे.

मंजूर विकास योजनेतील मौजा - मोर्शी, ता. मोर्शी, शेत सर्वे क्र. ३४ मधील आरक्षण क्र. ६ “ट्रक टर्मिनस” मधिल २.२० हे. आर/क्षेत्र औद्योगिक प्रयोजनार्थ दर्शविणे.

नगर परिषदेने सर्वसाधारण सभा दि. ०२ जून २०२२ चे ठराव क्र. १६ अन्वये महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम ३७ नुसार मोर्शी शहराच्या मंजूर विकास योजनेतील सदर फेरबदल करण्याचे ठरविले आहे.

यावरुन फेरबदलाचे प्रस्तावाबाबत सूचित करण्यात येते कि, ज्या कुणास वरिल बदलाबाबत काही आक्षेप अथवा सूचना पाठवयाच्या असतील त्यांनी हि सूचना महाराष्ट्र शासन राजपत्रात प्रसिद्ध झाल्यापासून (दिनांकापासून) ३० (तीस) दिवसाचे आत प्रशासक, नगर परिषद मोर्शी/ मुख्याधिकारी, नगर परिषद, मोर्शी यांचे कडे लेखी सादर कराव्यात. वरील फेरबदलाचा प्रस्ताव शासनाकडे मंजुरीसाठी पाठविण्यापूर्वी सूचना व आक्षेपांचा विचार करण्यात येईल.

सदरह फेरबदल दर्शविणारा प्रमाणित नकाशा व अहवाल नगर परिषदेच्या कार्यालयीन कामकाजाच्या सर्व दिवशी व वेळेत जनतेच्या अवलोकनार्थ खुला ठेवण्यात आलेला आहे.

**सागर ढवळे,**
प्रशासक,
नगर परिषद, मोर्शी.

मोर्शी :
दिनांक १३ ऑक्टोबर २०२२.

---

भाग १-अ (अ.वि.पु.) म. शा. रा., अ. क्र. १५२.

BY ADMINISTRATOR, MUNICIPAL COUNCIL

Modification Under Section 37*(1)* of the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966 to the Sanctioned Plan of Morshi Municipal Council

No. MCM-Wo-TP-1039-2022—

The Development Plan of Morshi Town is prepared by Morshi Municipal Council under the provision of Maharashtra Regional and Town Planning Act, 1966 and has been sanctioned by Government Urban Development Department *Vide* Resolution No. TPS 2803-1698-CR-377CB-2003-UD-30, Dated 11th July 2005 to come into force from Dated 1st September 2005. Also Republished Development Plan by Government Urban Development Department *vide* Resolution TPS-2806-298-CR-186-2006-UD-30 dated 28th March 2008 and come into force from 15th May 2008.

The Modification Necessary for Development of Morshi Town is as under.

As per sanctioned Development Plan, The Proposed Mouja - Morshi 2.20 Hector Area Under Survey No. 34 Reservation No. 6 “TRUCK TERMINUS” should be shown for “Industrial Zone”.

The Municipal Council *Vide* Resolution No. 16 Dated 2nd June 2022 has therefore decided to make the above cited modification in Development Plan under Section 37 *(1)* in Maharashtra Regional and Town Planning and Act, 1966. Whereas in pursuance of Section 37 of Maharashtra Regional and Town Planning and Act, 1966. It is hereby notified that any person having objection or suggestion in regards to proposed modification may communicate in writting to Administrator / Chief Officer, Municipal Council, Morshi within 30 days from date of publication of the Notice in *Maharashtra Government Gazette.* the suggestion and objection received within the above period should be considered by the Council before submitting the proposal of Modification to Government for Sanction.

The Part Plan of Development Plan Under Modification and Report therefore duly signed kept ready for public inspection during office hours in the office of Municipal Council, Morshi on all Working Days.

Morshi :
Dated the 13th October 2022.

SAGAR DHAWALE,
Administrator,
Municipal Council, Morshi.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT PRESS AND BOOK DEPOT, CIVIL LINES, NAGPUR-440 001 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI-400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.